# <u>सूचना</u>

विषय :- <u>रिट याचिका क्र.९२०/२००९</u>
**अमित शर्मा**
**विरुध्द**
महाराष्ट्र शासन व इतर

**इंटर नॅशनल बिझनेस स्कूल, मुंबई येथील एमबीए या पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतची सूचना.**

इंटर नॅशनल बिझनेस स्कूल मुंबई या संस्थेला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, तसेच राज्य शासनाकडून मान्यता नसल्यामुळे विद्यार्थ्यांची फसवणूक झाली असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे, वरील रिट याचिका दाखल करण्यात आली होती. सदर अभ्यासक्रम विना-मान्यता चालविला जात असल्यामुळे सदर संस्थेची जागा सील करण्यात आलेली आहे. मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.७/९/२००९रोजी सदर रिट याचिकेमध्ये दिलेल्या आदेशास अनुसरुन सदर संस्थेला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली व राज्य शासनाची मान्यता मिळेपर्यन्त संस्थेतील एमबीए हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविता येणार नाही व संस्थेचे सील कायम राहिल, असे संस्थेस कळविण्याची सूचना शासनाने दिली आहे.

शासनाने दिलेल्या वरील सूचना लक्षात घेऊन सदर संस्थेला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, व राज्य शासनाकडून एमबीए अभ्यासक्रम चालविण्यासाठी जोपर्यन्त मान्यता मिळत नाही तोपर्यन्त संस्थेचे सील कायम राहिल म्हणून सदर संस्थेतील एमबीए या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थी व पालकांनी त्यांची फसवणूक होऊ नये म्हणून सदर संस्थेतील अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाकडून मान्यता प्राप्त आहे किंवा नाही याची खात्री केल्याशिवाय प्रवेश घेऊ नये अन्यथा होणा-या सर्व परिणामास विद्यार्थी व पालक स्वतःजबाबदार राहतील शासन व हे संचालनालय त्यास जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

(सही)
प्र.संचालक

C:\Mamta Yele\Note.doc